Rules of Admission

## विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी नियम

१) जर एखाद्या विद्यार्थाचा प्रवेश अवैध ठरला तर त्याला, त्याने भरलेले कोणतेही शुल्क परत मिळणार नाही.

२) ज्या विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र राज्याच्या बाहेरच्या विद्यापीठातुन परीक्षा उतीर्ण केली असेल अशा विद्यार्थीने प्रवेशाच्या वेळी त्याने पास केलेल्या पात्रता परीक्षेची मुळ गुणपत्रिका, मुळ टी.सी. विद्यापीठाचे प्रवजन प्रमाणत्र (मायग्रेशन सर्टिफीकेट इ. कागदपत्रे सोबत आणावे.

३) विद्यापीठाने निश्चित केलेल्या तारखेनंतर प्रवेश दिला जाणार नाही.

४) विद्यार्थ्याने प्रत्येक वर्गात व विषयात ७५ टक्के उपस्थिती आवश्यक आहे. यापेक्षा कमी उपस्थिती असेल त्या विद्यर्थ्याला / विद्यापीठाच्या परीक्षेत बसू न देण्याची तरतूद अध्यादेशात आहे. सतत ७ दिवस पूर्वपरवानगी शिवाय अनुपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्याचे नांव हजर पटावरून कमी करण्यात येईल.

५) प्रत्येक विद्यार्थीस ओळखपत्र दिले जाईल. त्यासाठी ३०/- रूपये शुल्क आकरले जाईल. विद्यार्थ्यांनी आपला पासपोर्ट साईज चा नुकताच काढलेला फोटो त्यावर चिकटवावा व इतर माहीती भरुन फोटो व इतर माहीती प्राचार्याकडून सही शिक्यानिशी प्रमाणित करून घ्यावी. ओळखपत्राशिवाय वर्गात बसता येणार नाही. किंवा लायब्ररी कार्डही मिळणार नाही.

६) विद्यार्थ्यांने शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी केव्हाही महाविद्यालय सोडल्यास त्याला सत्राचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

७) प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश घेतांना आपला प्रवेश विद्यापिठाच्या नियमानुसार आहे. किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. यातील चुकीसाठी महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

८) महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी खोटी माहिति किंवा महत्वाची माहीती दडवून प्रवेश घेतला असल्यास तो प्रवेश ताबडतोब रद्द केला जाईल.

९) महाविद्यालयाविषयी कोणत्याही प्रकारची माहिति प्राचार्यांच्या संमतीशिवाय कोणत्याही स्थानिक अगर कोणत्याही गावाहून प्रसिध्द होणाऱ्या वर्तमानपत्रात अगर अन्यरित्या छापण्यासाठी देता येणार नाही.

१०) वरील सर्व नियमाशिवाय विद्यार्थ्यांवर विद्यापीठाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.



## विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी नियम

११) प्राचार्यांना प्रवेश देण्याचा अथवा प्रवेश रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार राहील. त्यासाठी त्यांना कोणतेही कारण दर्शविण्याचे बंधन राहणार नाही. व त्यांचा निर्णय अंतीम राहील.

१२) रेल्वे सवलत/एस.टी. सवलत विद्यार्थ्याला त्यांनी आवेदनपत्रात नमुद केलेल्या कायम पत्याच्या आधारावर दिल्या जाईल. विद्यार्थ्याने स्थानिक पत्ता देतेवेळी तो तपशिलासह द्यावा. त्यात बदल असल्यास तशी माहिति त्वरीत कार्यालयात द्यावी.

१३) विद्यापीठ नियमानुसार पद्वी पर्यतच्या विद्यार्थ्याला महाविद्यालयाने नेमलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून ठरविलेल्या तारखेला वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे.
तसेच शारिरिक क्षमता चाचणी ही महविद्यालयाच्या क्रिडांगणावर ठरविलेल्या तारखेला घेण्यात येईल.
बरील वैद्यकीय तपासणी व शारिरीक क्षमता चाचणी ला अनुपस्थित असल्यास विद्यार्थीकडून १०० रू. दंड आकारण्यात येईल.

## आवेदन पत्रासोबत जोडावयाची कागदत्रे

१) स्वत:चा पूर्ण चेहरा असलेले ४६ से.मी. आकाराचे छायाचित्र.

२) शाळा/महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र (T.C.) (इथे मुळ कागदपत्र देण्याआधी स्वत:साठी झेरॉक्स काढून ठेवाव्या. प्रवेश घेतल्यानंतर कार्यालयातून कोणत्याही प्रकारच्या जमा केलेले मुळ प्रमाणपत्र व त्यांच्या सत्यप्रती मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३) पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याची मूळ गणुपत्रिका व त्याची एक सत्यप्रतिलिपी (प्रमाणित)

४) पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर खंड पडून त्यानंतर महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असेल तर दंडाधिकाऱ्याचे खंड पडण्याचे कारण दर्शविणारे व खंड काळात विद्यार्थ्यांने कुठल्याही शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला नसल्याचे मुळ ऑफिडेव्हिट व झेरॉक्स प्रत.

५) नामांकन आवेदन पत्र विद्यार्थ्याला नामांकनासाठी ठाराविक नमुन्यातच आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदनपत्रांसोबत नामांकन शुल्क व पात्रता परीक्षेची मूळ गुणपत्रिका जोडावी. लागेल. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ह्यांची उच्च माध्यमिक परिक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्या व्यतिरिक्त इतर मंडळाची / विद्यापीठाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्या व्यतिरिक्त इतर मंडळाची / विद्यापीठाची पात्रता परीक्षा उर्तीर्ण होऊन विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला असेल तर अशा विद्यार्थ्यास ही नामांकन आवेदनपत्र भरावे लागेल. नामांकन आवेदनपत्र ठरवुन दिलेल्या मुदतीत भरले पाहिजे मुदतीनंतर विलंबशुल्क आकारले जाईल.

## आवेदन पत्रासोबत जोडावयाची कागदपत्रे

६) प्रवजन प्रमाणपत्र : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा अमरावती व त्यांच्या विभागीय मंडळा व्यतिरिक्त तचेव अमरावती विद्यापीठा व्यतिरिक्त इतर मंडळे / विद्यापीठ यांच्या परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीला संबंधित मंडळातून/विद्यापीठाकडून प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) आणावे लागेल व त्यासाठी परिशिष्ठात नमूद केलेले शुल्क भरावे लागेल. प्रमाणपत्र १ ऑक्टोंबर पूर्वी दाखल न केल्यास विलंब शुल्क भरावे लागेल.

७) कोणतीही स्कॉलरशिप घ्यायची असेल तर प्रेवश आवेदनपत्रासोबत जातीच्या दाखल्याची झेरॉक्स लावणे आवश्यक आहे. व आधार कार्डची झेरॉक्स सुध्या लावावी लागेल.

## ग्रंथालयाचे नियम

१) विद्यार्थ्यांने / विद्यार्थ्यीनींने महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर सभासद क्रमांक ग्रंथालयातुन घ्यावा.

२) सभासद क्रमांक काढतांना प्रवेशपावती व ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे.

३) ग्रंथालयातून पुस्तकांची मागणी करतांना विद्यार्थीला आपले ओळखपत्र दाखविणे अनिवार्य आहे. त्याशिवाय पुस्तके दिली जाणार नाही.

४) ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके ८ दिवसांच्या आत परत करावी उशीरा परत केल्यास प्रत्येक पुस्तकाला ५/-रू. प्रमाणे प्रतिदिवस दंड आकारण्यात येईल.

५) पुस्तक हरविल्यास विद्यार्थीला पुस्तकाची दुसरी नवीन प्रत ग्रंथालयात सादर करावी लागेल. किंवा पुस्तकाची मुळ किंमत भरावी लागेल.

६) पुस्तक घेतांना सुव्यवस्थित आहे किंवा नाही ते तपासून घ्यावे व विद्यार्थ्यांने पुस्तक परत करतेवेळी बरोबर न आढळल्यास किंवा त्यांची पाने पुस्तकातून गहाळ झाल्याचे आढळल्यास विद्यार्थाला त्या पुस्तकाची दुसरी प्रत ग्रंथालयात सादर करावी लागेल.

७) ग्रंथालयातून शब्दकोश, मासिके, वर्तमानपत्रे व संदर्भग्रंथ तसेच विद्यापीठ प्रश्नपत्रिकेचे संच घरी नेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

८) विद्यार्थीला हव्या असलेल्या पुस्तकाची मागणीपत्रक १ दिवस अगोदर ग्रंथालयात संबंधीत कर्मचाऱ्याजवळ जमा करावी.

९) विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) योजने अंतर्गत होतकरू विद्यार्थीला पुस्तक दिल्या जाईल. व या संबंधी माहितीसाठी ग्रंथालयात संपर्क साधावा.